

# गंमत जम्मत

IGNUS
KNOWLEDGE EMPOWERS

SAVE The Children India

educo
Member of ChildFund Alliance

# गंमत जम्मत पुस्तिका बद्दल

- **"गंमत जम्मत" पुस्तिका का बनवली आहे?**

चालू शैक्षणिक वर्षात (२०२० -२१) शाळा नेहमी सारख्या सुरु झाल्या नाहीत, कारण सध्याच्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव सर्वदूर पसरला आहे. सर्वांची सुरक्षा पाहता शाळा जरी बंद असल्या तरी शिक्षण सुरु आहे. विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी जी काही साधने आहेत, जसे कि वॉट्स अँप, आणि एसएमएसचा उपयोग केला जात आहे. "गंमत जम्मत" ही पुस्तिका बनवणे, त्याची छपाई आणि वितरण देखील मुलांपर्यंत पोहोचण्याचा एक प्रयत्न आहे.

- **"गंमत जम्मत" पुस्तिका काय आहे?**

विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार त्या इयत्तेतील कौशल्ये आत्मसात करण्यासाठी पूरक साहित्य म्हणून हि "गंमत जम्मत" पुस्तिका आहे. कृती करण्यात मुलांचा सहभाग, आवड आणि मनोरंजन सोबत अध्ययन निष्पत्ती आणि काठीण्यापातळीकडे पण लक्ष देण्याचा प्रयत्न केला आहे.

- **"गंमत जम्मत" पुस्तिका चे स्वरूप कसे आहे?**

– मुलांना हे साहित्य कार्यपत्रिका .स्वरुपात दिले आहे (वर्कशीट)
– पुस्तिकेमध्ये दिलेल्या कृती सोबत दिलेल्या वहीत सोडवायच्या आहेत.
– पुस्तिका दोन स्तरानुसार बनवण्याचा प्रयत्न केला आहे (वर्ग १ ते ३, वर्ग ४ आणि ५).
– घरात व स्थानीय परिसरात सहज उपलब्ध वस्तूंचा उपयोग होईल असे प्रश्न आणि कृती यामध्ये समाविष्ट केल्या आहेत.
– पुस्तिकेतील वर्कशीट्स शाळेच्या नियमित अभ्यासाची उजळणी (अगोदर शिकलेल्या भागाची), काही नवीन शिकणे, सराव आणि दृढीकरणासाठी सहाय्यक ठरू शकतील.

मुलांना या पुस्तिकेचा कसा उपयोग होत आहे हे जाणण्याकरिता पुस्तिकेच्या शेवटी एक सारणी दिली आहे. जसे-जसे मुलं कृती करतील, त्या सारणीत कृती समोर केल्याची खूण करून दिनांक लिहावे. त्याच बरोबर कृती विषयी दिलेले प्रश्नांबद्दल आपले प्रतिसाद लिहून कळवावे अशी विनंती.

मुलांना दिलेल्या कृतीमध्ये काय आणि कसे करायचे हे समजण्यासाठी घरातल्या मोठ्यांची मदत लागू शकेल. याकरीता, पुस्तिकेत काही चिन्ह दिले आहेत:


मुलांनी वहीमध्ये लिखाणकाम करावे


मुलांनी स्वत: वाचून सांगितलेले करावे


मोठ्यां सोबत/ पालकांनी वाचून समजवावे


पालकांनी कृतीत मदत करावी

आशा आहे की मुलं ह्या पुस्तिकामध्ये सुचविलेल्या कृतींचा आनंद घेतील. आम्ही आपल्याकडून याबद्दल ऐकण्यासाठी उत्सुक आहोत. तुम्हाला यातील कोणत्या गोष्टी आवडल्या आणि कुठे बदल किंवा सुधार करण्याची गरज आहे, असे वाटते, ते आम्हाला नक्की कळवा. यासाठी किंवा कृतीबद्दल तुमचे प्रश्न असतील तर आमच्या टीम बरोबर खाली दिलेल्या फोन वर संपर्क साधावे.

| वार | वेळ | संपर्क करावयाच्या व्यक्तीचे नाव | फोननंबर |
|---|---|---|---|
| सोमवार, मंगळवार | सायंकाळी 4 ते 7 | सविता ठोंबरे | 9766588023 |
| बुधवार, गुरुवार | सायंकाळी 4 ते 7 | भाविका नेमाडे | 8888893965 |
| शुक्रवार, शनिवार | सायंकाळी 4 ते 7 | भारती मेटांगे | 9604797117 |

## यात काय आहे?

| क्र. | कृतीचे नाव | वर्णन / माहिती |
|---|---|---|
| १. | बोलूया चित्रा वरती | प्रसंगाला अनुसरून चर्चा |
| २. | चला चिंटू सोबत | खरेदी विक्रीच्या माध्यमातून व्यवहार ज्ञान शिकणे. |
| ३. | मोठ्यांच्या मदतीने शिकू काही | घरातील मोठ्यांना काम करताना बघून, त्या बद्दल चर्चा व प्रश्न विचारून त्या कार्याबद्दल शिकणे |
| ४. | आम्हालाच सर्व सांगतात. | विविध प्रसंगी स्वतःचे मत मांडणे. |
| ५. | एक उभी रेषा आणि एक आडवी रेषा | आजूबाजूच्या वस्तूंचे निरीक्षण करून शोध व चर्चा |
| ६. | ओळखा पाहू मी कोण | दिलेल्या माहितीवर विचार करून कोडी सोडविणे आणि बनविणे |
| ७. | जाहिरातबाजी | दिलेल्या जाहिरातीचा अभ्यास करून नवीन जाहिरात बनविणे. |
| ८. | पत्त्यांच्या खेळाची गंमत | वेगवेगळ्या अंकांची कार्डे घेवून संख्यांच्या स्थानिक किमती ओळखणे. |
| ९. | मुठीची मजा | घरातील वेगवेगळ्या वस्तूंचे प्रमाण बघणे, समजणे, तुलना करण्याची कृती. |
| १०. | चित्रावरून गोष्टीकडे | दोन विविध चित्रांच्या आधारे कल्पना करून कथा लेखन करणे. |
| ११. | जादू दाखवा | वेग वेगळ्या युक्त्या, गणितीय क्रियांचा वापर करून कोडे सोडवा. |
| १२. | शब्दचक्र | समानार्थी शब्दांचा आधार घेऊन कोडे सोडविणे. |
| १३. | शिकूया चित्रातून | चित्राच्या माध्यमातून व्याकरणातील बारकावे शिकणे. |
| १४. | दरवाजे आणि खिडक्या | घरातील खोल्या, खिडक्या, दारे, गच्ची यांचा अंदाज घेवून नकाशा काढणे. |
| १५. | चित्र विचित्र चेहरे | विविध प्रसंगी देत असलेल्या प्रतिक्रियांचे निरीक्षण करणे. |
| १६. | ऋतूंची गंमत | वेगवेगळे ऋतू, संबंधीत हवामानातील बदल, ऋतूतील फळे, भाज्या, पिके यांचा बद्दल जाणून घ्यायची कृती करणे . |
| १७. | ओळख स्वतःला व कुटुंबाला | स्वतःविषयी आणि कुटुंबाविषयी जाणून लिहिणे. |
| १८. | कोरोना शब्दकोडे | खेळाच्या माध्यमातून कोरोना विषयी माहिती. |

## १ बोलूया चित्रावरती



**अ:**



१) या चित्रावरून जास्तीत जास्त शब्द लिहा.

२) तुम्ही लिहिले शब्द वापरून वाक्य बनवा.

३) तुम्ही लिहिलेल्या वाक्यांचा एक परिच्छेद तयार करा. (अर्थ,वाक्यांचा क्रम या गोष्टी लक्षात घ्या)

**आ:**

१) चित्रामध्ये पावसामुळे भिजू नये म्हणून काय काय वापरले आहे? या व्यतिरिक्त आपण काय वापरू शकतो?

२) या चित्रामधील तुम्हाला आवडलेल्या दोन गोष्टी लिहा.

३) या चित्रातील अशा दोन गोष्टी सांगा ज्या तुम्हाला आवडल्या नाही आणि बदलायला आवडतील?

४) तुमची कधी पावसामध्ये फजिती झाली आहे का? काय झाले होते त्याचे वर्णन लिहा.

५) आपल्या सारखी पक्ष्यांची पण कधी फजिती होत असेल का? हो ? नाही? का?

६) तुम्हाला जर अचानक सुट्टी मिळाली तर तुम्ही खेळण्याशिवाय कोणत्या गोष्टी करता?

**इ:**

**दिलेल्या शब्दा मधून योग्य शब्द निवडून रिकाम्या जागी लिहा**.

**मेघ** (ढग), **खग** (पक्षी), गुरे, आसरा, पर्जन्याचे, कन्या, गोणपाटाचे, आश्रय, पाऊस

१) हे ---------------------- चित्र आहे.

२) दोन -------------------- एका छत्रीखाली --------------------घेतला आहे.

३) पक्ष्यांनी झाडाचा -------------------- घेतला आहे

४) आकाशामध्ये खूप काळे -------------- दिसत आहे.

५) एका शेतकऱ्याने डोक्यावर ---------------- घोंगडे घेतले आहे.

## २. चला चिंटू सोबत



| | | | | |
|---|---|---|---|---|
|  रबर 1रु |  पेन्सील 5 रु |  पेन 10 रु |  रंगपेटी 20 रु |  पुस्तक 20रु |
|  टोकयंत्र 5 रु |  पट्टी 10 रु |  स्टेपलर 50 रु |  कंपासपेटी 100 रु |  दप्तर 200 रु |

चिंटू त्याच्या वडिलांसोबत खरेदी करायला गेला आहे. त्याला काही वस्तू खरेदी करायच्या आहेत.  बाबांनी चिंटूला 40 रुपये दिले आणि जे पाहिजे ते घ्यायला सांगितले. चिंटूने दुकानदार काकांना पेन्सील, टोकयंत्र, पट्टी, पुस्तक, रंगपेटी, पेन या  वस्तू द्यायला सांगितल्या. या वस्तूंसाठी किती पैसे द्यावे लागतील? 40 रुपये पूर्ण खर्च होतील का? रुपये उरतील का? कमी पडतील का? किती?

१) तुम्हाला जर 60 रुपये दिले तर तुम्ही या दुकानातून कोणकोणत्या वस्तू खरेदी कराल?

२) तुम्हाला दोनच वस्तू घेता येत असतील तर काय घ्याल आणि का?

३) वरील कोणत्याही पाच वस्तूंच्या किंमती तुम्हाला बदलता आल्या तर तुम्ही कोणत्या वस्तूंची किंमत बदलाल? का? नवीन किंमत काय देणार?

४) जर तुम्ही दुकानदार झालात आणि तुम्हाला फायदा वाढवायचा असेल तर काय काय कराल? तीन गोष्टी सांगा.

५) असे कधी झाले आहे का कि मोठ्यांनी सामान आणायला सांगितले पण दिलेले पैसे कमी पडले? अशा वेळी तुम्ही काय निर्णय घ्याल?

## ३. मोठ्यांच्या मदतीने शिकू काही गोष्टी

१ घरातील मोठ्या व्यक्तीं सोबत चर्चा करा.

कडधान्य व डाळी किती प्रकारचे असतात? तुमच्या घरी त्यातील कोणते वापरतात? घरात असतील त्या डाळी आणि कडधान्य बघून त्यांचे चित्र काढा व त्यांची नावे लिहा.

२ मोठ्यांच्या मदतीने चपाती कशी बनवतात याची माहिती घ्या. तुम्ही स्वतः बनवा किंवा ते कसे बनवतात ते लक्ष देऊन बघा. समजल्यावर चपाती बनविण्याची कृती वहीत लिहा.

३ चपाती बनविण्याच्या प्रक्रियेत कोणती क्रिया तुम्हाला सगळ्यात जास्त महत्त्वाची वाटते? का?

४) तुमच्या घरात कार्डबोर्डचे खोके किंवा जुने डबे असतील. त्यामध्ये थोडी माती टाकून तुमच्याकडे असणाऱ्या कोणत्याही हिरव्या भाज्यांचे बी (पालक, मेथी, कोथंबीर,) किंवा कडधान्य (४-५ दाणे) पेरा. त्यावर रोज थोडे पाणी शिंपडा.

- ते पूर्ण उगवेपर्यंत त्याचे निरीक्षण करा. देखभाल करा.
- बी उगवत असताना त्याच्यामध्ये जे बदल होतात त्याचे निरीक्षण करा.
- वहीत त्या दिवसाची तारीख टाकून जे जसे दिसते त्याचे चित्र काढा. होणारे बदल लिहू पण शकता..
- पूर्ण उगविले कि छान फोटो काढून पाठवा!

## ४. आम्हालाच सर्व सांगतात! (कविता)



सूर्याला म्हणत नाही कोणी
प्रकाश नको येथे पसरवू
चंद्राला म्हणत नाही कोणी
उठ चांदणीला घेऊन जा





हवेला सुद्धा कोणी बोलत नाही
खबरदार जर आत बाहेर केलेस तर
बरे ढगांना कोणी म्हणते का
का रे इथे पाऊस का पाडला

मग आम्हाला का दादा म्हणतो
येथे नको येऊ जा तिकडे
आई म्हणते इकडे तिकडे नको धावू
खेळण्याचा पसारा नको करू
बाबा म्हणतात बाहेर खेळ
खबरदार जर दूर गेलीस तर
आमच्या वरच सर्वांचा हुकुम ज्याला वाटेल तो रागवेल

## कवितेत बघून प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) या कवितेप्रमाणे कोण काय करतो?

- सूर्य -
- ढग –

२) या कवितेत कोण काय सांगते?

- दादा –
- आई –
- बाबा –

३) या कवितेमध्ये लोकांची, वस्तूंची आणि जागांची नावे आली आहेत ते वाचा आणि लिहा.

- लोकांची नावे -
- गावांची नावे -
- वस्तूंची नावे–

४) या कवितेला तुम्हाला आवडेल असे अजून एक नाव / शीर्षक द्या.

## चर्चा करा. वहीत लिहा

१) तुम्ही कधी कोणाला “असे कर!” सांगितले आहे का?

२) तुम्ही कधी कोणाला “असे करु नको!” सांगितले आहे का?

३) तुमचे कोण कोण ऐकते?

४) तुम्हाला काय करायला आवडते? अशा ३ – ५ गोष्टी लिहा.

५) तुम्हाला काय करायला आवडत नाही? अशा ३ – ५ गोष्टी लिहा.

६) तुम्हाला नवीन काय करायला आवडेल?

७) कोणी जर तुम्हाला सारखे टोकत असेल तर त्यांना तुम्ही काय सांगणार? नम्रपणाने कसे समजवणार? ते लिहा.

# ५. एक उभी रेषा एक आडवी रेषा



“श्रावणी चल ना ग खेळायला, आज तर रविवार आहे आणि तु काय करत आहेस”, श्रीकांत म्हणाला.

श्रावणी म्हणते, “श्रीकांत मला एक उभी रेषा आणि त्याच्या कोणत्याही एका टोकाला आडवी रेषा जोडलेले असे आकार किंवा रचना शोधायच्या आहे.”

“उभी रेषा आणि आडवी रेषा! “हे काय नवीन”, श्रीकांत म्हणतो.

“अरे!  हे बघ, इंग्रजीमधील ‘L’  हे अक्षर आहे ना तसे.”





श्रीकांत इकडे तिकडे बघतो आणि आनंदाने म्हणत “अग, ते बघ, घड्याळामध्ये आहे उभी रेषा आणि आडवी रेषा”.

“श्रीकांत ते बघ, खिडकी मधल्या ज्या लोखंडी सळ्या आहेत त्यांच्यामध्ये पण होऊ शकत” श्रावणी म्हणाली.





“होग, अग असे तर आपले हात पण होऊ शकतील”, श्रीकांत म्हणाला.

“अरे हो खरच! आपण अजून असे आकार शोधू”, श्रावणी म्हणाली.

त्या दोघांनी आपले आपले मास्क घातले आणि घराचे दार उघडून बाहेर बघितले.

श्रावणी म्हणाली ते बघ, “विजेचा खांब एक उभा खांब आणि त्याला आडवी पट्टी ज्याला दिवा लावला आहे”.

श्रीकांत म्हणाला, “अग हो, ते बघ मेडिकलच्या दुकानावर असलेल्या अधिकच्या चिन्हा मध्ये पण दिसत आहे.  श्रावणी, असे तर चर्चवर देखील असत”.

“किती छान मदत केली श्रीकांत. आता मी हे सर्व लिहून काढते”,  श्रावणी म्हणाली.

१) श्रावणीला काय करायचे होते?

२) उभी रेषा आणि आडवी रेषा वापरून अजून कोणते आकार बनवु शकतो? चित्र काढून दाखवा.

३) श्रावणी आणि श्रीकांतने जे जे शोधले त्याचे चित्र तुम्ही तुमच्या वहीमध्ये काढा.

४) त्यांनी शोधलेली सगळी उदाहरणे बरोबर आहेत का?

५) त्यांनी जे शोधले त्या शिवाय अजून असे आकार तुम्ही कुठे बघितले आहेत का? ते लिहा. त्याचे चित्र काढा.

६) आपण घड्याळाचे काटे फिरवले तर आपल्याला अजून कोणकोणत्या ठिकाणी एक उभी रेषा आणि त्याला आडवी अशी दुसरी रेष दिसेल? तसे चित्र काढून दाखवा.

७) आता तुम्हाला सभोवताली अश्या उभ्या - आडव्या, आडव्या - तिरक्या, रेषांनी बनलेले आकार अजून कोठे दिसतात? शोधा व लिहा आणि त्यांचे चित्र काढा.

.

## ६. ओळखा पाहू मी कोण?

**वाक्यात कशाबद्दल सांगितले आहे ओळखा!**

तुमच्या मदतीसाठी चित्र दिले आहेत. पण ते जरा इकडे तिकडे झाले आहेत.





सर्वांना हवा हवासा वाटणारा पण हात लागेल तर टोचणारा?

*गुलाब*



पाने आहेत कडू पण गुण आहे फार? ___________





जेवणासाठी मला विकत घेतात पण खातच नाही! ` ___________

भुण भुण करून करतो मी सर्वांना हैराण?___________



तीन अक्षरचे माझे नाव उलट सरळ एक समान? ___________

पाय नाही तरी सुद्धा चालत असते, दोन्ही हातानी तोंड पुसत असते?___________

मला वापरायच्या आधी तोडतात?___________



**असेच गमतीदार कोडी बनवा. ते कोडे मित्र – मैत्रिणींना विचारा! आम्हाला पण कळवा.**

## ७. जाहिरातबाजी




१) वरील जाहिरातीत किती ऑफर (सवलती) आहेत? कोणत्या?

२) एक फॅमिली पॅक १५०रु. ला असेल तर रेवा आईस्क्रीम पार्लरला तो कितीला मिळेल?

३) वरील जाहिरात तुमच्या मित्राला कळवायची असेल तर तुम्ही कसे सांगाल? वहीत लिहा.

४) तुमच्या शाळेत १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम आहे. त्या दिवसाकरिता विद्यार्थी आणि शिक्षकांनी मिळून विशेष कार्यक्रम तयार केला आहे. त्यात तुम्हाला तुमच्या पालकांना बोलवायचे आहे. त्या कार्यक्रमात पालकांना निमंत्रित करण्याची जाहिरात वहीमध्ये तयार करा.

## ८. पत्त्यांच्या खेळाची गंमत

### १ ते ९ अंकांची कार्ड तयार करा

- जुना जाड पुठ्ठा घ्या. त्याचे सारखे ९ चौकोन कापा. प्रत्येक चौकोनी कार्डवर एक दोन तीन या प्रमाणे नऊ पर्यंत एक – एक अंक लिहा.
- झाले १ ते ९ अंकांचे ९ कार्ड तयार! आता पुढे ……

### आता पुढे

- कार्ड पत्त्यांसारखे पिसून घ्या.
- पहिले कार्ड उचला आणि - बाजूला ठेवा. असेच दुसरे कार्ड उचला आणि पहिले कार्डच्या बाजुला ठेवा.
- या प्रमाणे चार कार्ड उचला आणि ओळीत ठेवा.
- बघा – कोणती संख्या तयार झाली? (चार अंकी संख्या तयार होईल)



**बनवलेल्या संख्येसोबत काय करायचं? येथे खाली काही सुचवले आहे.**

### भाग – १



१) संख्या ओळखा – किती अंकी आहे?
२) संख्या अंकात आणि शब्दात लिहा.
३) त्या संख्यांची मागची, पुढची, संख्या लिहा.

### भाग – २

४) अंकांची जागा अदलाबदल करा. त्या चार अंकांना जर पुढेमागे केले तर त्यांच्या पासून किती वेगवेगळ्या संख्या बनवता येतात?
५) तुम्ही जेवढ्या संख्या बनवल्या त्या अंक आणि शब्दात लिहा?
६) शक्य तेवढ्या संख्या बनवून झाले कि तुम्ही बनवलेल्या संख्यांना क्रमाने लिहा.

**खेळा –** भाऊ बहिण किंवा घरातील अजून कोणी व्यक्ती तुमच्या सोबत खेळू शकता. वर सुचवल्या प्रमाणे खेळा.  आवडत असेल तर आपापसांत गंमतीत स्पर्धा पण करू शकता.

**तुम्ही खेळ बनवा**.

- या कार्ड सोबत अजून काय करता येईल? तुम्ही प्रयत्न करा.
- बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, अपूर्णांकबद्दल खेळ बनवता येतील का? बनवा आणि आपल्या मित्रांना सांगा. आम्हाला पण कळवा.

## ९. मुठीची मजा

खाली काही गोष्टींची नावे दिली आहेत.  त्यातील कोणत्या वस्तू तुमच्या हातात किंवा मुठीत येतात? वस्तू पकडून बघा.

| | | |
|---|---|---|
| **पाणी** | **तुळशीची पाने** | **लसूण** |
| **एकबूट** | **ताट** | **टोपली** |
| **रुमाल** | **प्रकाश** | **खडे** |
| **एक थेंब तेल** | **रबर** | **धूर** |
| **पुस्तक** | **साबणाचा फेस** | **पीठ** |
| **पिन** | **बटाटा** | **गहू** |



१) एका वेळेस किती वस्तू पकडू शकलात?

२) ज्या गोष्टीना सहज पकडू शकाल त्यांच्यावर गोल करा?

३) कोणत्या वस्तू तळ हातावर पकडणे जमत नाही असे का?

४) ज्या गोष्टी धरून ठेवू शकत नाही, ते काय केल्याने धरून ठेवू शकू?

५) ज्या वस्तू आपण पकडू शकतो त्यात काय सारखेपणा आहे? त्या का पकडता येतात?

**मोजुया:**

१) किती चमचे गहू एका वाटीत मावतात? आधी अंदाज लावा मग मोजून बघा.

२) आता त्याच वाटीतील गहू काढून त्यात किती चमचे तांदूळ मावतील बघा. तुमचा अंदाज सांगा. आता मोजून बघा!

३) या पद्धतीने एक-एक करून तुम्हाला पाहिजे त्या गोष्टी त्या वाटीत किती चमचे मावतील – त्याचा अंदाज लावा आणि मग मोजून बघा!

४) त्या वाटीत मोजलेल्या वस्तूं पैकी कोणती सगळ्यात जास्त जड वाटली ? सगळ्यात हलके काय वाटले ? असे का असेल ?

## १०. चित्रावरून गोष्टीकडे.

**ठिपक्यांवरून रेषा काढत दोन्ही चित्र पूर्ण करा. त्यात रंग पण भरू शकता.**



**हत्ती आणि कोल्हा दोघे फिरायला निघाले.**
**हत्ती एकदम थांबला आणि आनंदात जोरात ओरडला.**
**“अरे कोल्ह्या ते बघ..........”.**

- हत्ती काय म्हणाला असेल? मग कोल्ह्याने काय उत्तर दिले असेल? त्यांच्यात काय मजेदार चर्चा झाली असेल? विचार करा आणि वहीत लिहा.
- वरील चित्राच्या नंतर अजून एक चित्र काढायचे असेल तर काय काढाल? ते काढा आणि गोष्टपण पुढे न्या.

**हे चित्र बघा. इथे कोण कोण आहेत? ते काय करत आहेत?**



१) दगडा वरून उडी मारताना तो माकड माशांना काय म्हणत असेल?

२) माकडे नदीवर का आले असतील?

३) वरील चित्रात जे दिसत आहे त्या आधी काय झाले असेल?

४) दिलेल्या चित्राच्यावर आधी काय झाले असेल?
ते चित्र काढले तर त्या चित्रात तुम्ही काय-काय काढाल? इथे किंवा आपल्या वहीत ते चित्र काढा.

५) इथे दिलेले व तुम्ही काढलेले चित्र – असे हे दोन्ही चित्र धरून एक गोष्ट बनवा आणि लिहा. तुम्ही बनविलेली गोष्ट इतरांना सांगा!

## ११. जादू दाखवा

**मित्रांनो तुम्ही कधी जादू बघितली आहे का? केली आहे? चला एक जादू पाहू!**

तुम्ही तुमचे वय लक्षात घ्या. (कोणालाही सांगू नका फक्त मनात धरा)

१) आता तुम्ही पुढच्या वर्षी जितक्या वर्षाचे होणार आहात ते वय आणि तुमचे वय यांची बेरीज करा.

२) आता आलेल्या संख्येला 5 ने गुणा.

३) नंतर आलेल्या संख्येमध्ये 4 मिळवा.

४) आता आलेल्या संख्येमधून 5 कमी करा.

५) कोणती संख्या मिळाली सांगा?

६) तुमच्या उत्तरा मधील सुरवातीचे अंक तुमचे वय आहे.



**आपण एक उदाहरण बघू**

१) समजा राजेशचे वय 10 आहे. (आणि त्याने ती संख्या मनात ठेवली.)

२) पुढच्या वर्षी तो 11 वर्षाचा होईल.

३) तर या दोन्ही वयांची (संख्या) बेरीज करायला सांगायची. म्हणजे: राजेशचे आजचे वय 10 + पुढच्या वर्षी तो 11 वर्षाचा होणार आहे यांची बेरीज = 21.

४) आता आलेल्या संख्येला 5 ने गुणायला सांगायचे. 21 x 5 = 105

५) नंतर आलेल्या या संख्येत 4 मिळवायचे आहे. म्हणजे 105 + 4 = 109

१) आता आलेल्या संख्येतून 5 कमी करायचे आहे. म्हणजे 109 – 5 = 104

२) आता राजेशला शेवटचे उत्तर विचारले तर तो सांगेल 104.

३) त्या संख्येतील सुरवातीचे २ अंक आहे राजेशचे वय ! म्हणजे 10.

**आहे कि नाही गंमत!**



१) तुम्ही देखील तुमच्या आईचे, वडिलांचे भाऊ - बहिणीचे असे वय काढून बघा आणि त्यांना आश्चर्य चकित करा.

२) विचार करा: हि जादू कशी होत असेल? कोणत्या पण संख्यासोबत करता येईल का? याच्या मागील गणित काय असेल?

तुम्ही देखील अश्या नवीन कल्पना शोधा आणि जादू बनवा. तुम्ही बनवलेली जादू लिहा आणि आपल्या मित्रांना, आम्हाला दाखवा.

## १२. शब्दचक्र

**खाली दिलेल्या शब्दांचा आधार घेवून शब्द्चक्र पूर्ण करा.**






१) सगळ्यात वरच्या रकान्यात अक्षर लिहून तीन अक्षराचे  शब्द बनवा.

२) चक्रातल्या प्रत्येक शब्दाचे शेवटचे दोन अक्षर -  'का' आणि 'र' आहे आणि ते चक्रात लिहिलेले आहेत. तुम्हाला पहिले अक्षर लिहायचे आहे.

३) पूर्ण शब्द व त्या वरून पहिले अक्षर ओळखण्यासाठी खाली दिलेल्या पर्यायी शब्दांचा आधार घ्या.

उदाहरण: दिलेल्या पर्यायी शब्दांमध्ये आहे "रोग आणि आजार" या शब्दांना आपण विकार पण म्हणतो.  तर एक नंबरच्या वरील रकान्यामध्ये 'वि' लिहिले कि पूर्ण शब्द झालाविकार

असेच पुढे दिलेल्या पर्यायी शब्दांची मदत (हिंट) घेवून शब्द्चक्र पूर्ण करा.

## पर्यायी शब्द

| | | |
|---|---|---|
| १. रोग, आजार | ४. बाराखडीतील एक भाग | ७. विविध, नाना |
| २. आकृती | ५. पूर्ण होणे | ८. कबूल करणे,जोडाक्षर आहे |
| ३. नाही म्हणणे | ६. हो म्हणणे | |

- तुम्हाला शेवटी ‘कार’ येणारे अजून काही शब्द माहित आहेत का? मोठ्यांची पण मदत घ्या आणि वहीत लिहा.
- जर चक्रात फक्त ‘क’ असते तर कोणते शब्द लिहिले असते? असे ‘क’ अक्षर असणारे ५-८ शब्द वहीत लिहा.
- जर चक्रात फक्त ‘र’ असते तर कोणते शब्द लिहिले असते? असे ‘र’ अक्षर असणारे ५-८ शब्द वहीत लिहा.
- असे शब्दचक्र किंवा कोडे तुम्ही पण बनवा आणि आम्हाला फोटो पाठवा.

## १३. शिकूया चित्रातून



१) या चित्रात काय काय दिसत आहे? चित्रा वरून जास्तीत जास्त शब्द लिहा.
उदाहरण: मुली, लहान, खेळतात, पिशवी

२) वरील शब्दांचे खालील सारणीमध्ये वर्गीकरण केले आहे. तसे तुम्ही लिहिलेल्या सर्व शब्दांचे खालील सारणीमध्ये वर्गीकरण करा.

| **कोण किंवा काय? वस्तू, व्यक्ती, प्राणी, स्थान) (नाम)** | **ते कसे आहेत? वस्तू, व्यक्ती, प्राणी, स्थानबद्दल विशेष माहिती (विशेषण)** | **काय होत आहे / ते काय करत आहेत (क्रियापद)** |
|---|---|---|
| मुली | | खेळतात |
| पिशवी | लहान | |
| | | |
| | | |
| | | |

३) आता वरील शब्द वापरून वाक्य बनवा. प्रत्येक वाक्यात नाम, विशेषण किंवा / आणि क्रियापद वापरण्याचा प्रयत्न करा.
एक वाक्य बनवता ना नाम, विशेषण आणि क्रियापद प्रत्येक एका वेगळ्या ओळीतून घ्यायचे आहे.
*उदाहरण:* दोन लहान मुली झोका खेळत आहेत.

४) वरील चित्र रंगवा.

## १४. दरवाजे आणि खिडक्या

हे रीनाचे घर आहे. तिने आपल्या घराचा नकाशा काढायचा प्रयत्न केला आहे. कसा वाटतो? बरोबर आहे का ?





तुम्ही सुद्धा आपल्या घराचा असा नकाशा काढायचा प्रयत्न करा! आपल्या वहीत नकाशा काढा.. घरात् असतील तशा खोल्या, खिडक्या, दारे, गच्ची इ. दाखवा.

**खिडक्या:**



१) तुमच्या घरामध्ये एकूण किती खिडक्या आहेत? तुम्ही काढलेला घराचा नकाशा बघून सांगा?

२) आहेत त्या खिडक्यांची जागा आणि संख्या तुम्हाला बरोबर वाटते का? हो ? नाही? का?

३) त्यात बदल करता आले तर काय बदल कराल? तो तुम्ही नकाशात दाखवा. (या करिता रंगीत पेन्सील वापरा किंवा नकाशात दाखवताना ठिपकेदार रेषा काढा)

४) तुम्ही खिडक्यांची संख्या किंवा त्यांच्या जागेमध्ये काय बदल केले? का? बदल नाही केला तर ते का?

## १५. चित्र – विचित्र चेहरे

**या चित्रामधील प्रत्येक चेहऱ्यांमध्ये एक भाव दडला आहे.**



१) वरील चेहऱ्यांना नावे द्या. त्यांच्या चेहऱ्यावर ते भाव का आले असतील? कल्पना करा आणि लिहा.

२) तुमचे देखील चेहरे असे कधी होतात का? कोणत्या प्रसंगी? आठवा आणि लिहा.

३) तुम्ही असे चेहरे करून आरश्यामध्ये बघा तुम्ही कसे दिसता?

४) तुम्हाला तुमचा कोणता चेहरा सर्वात जास्त आवडला? का? लिहून सांगा.

५) सर्व चेहऱ्यावरील भाव येतील असा एखादा प्रसंग लिहा. (उताऱ्या सारखा)

## १६. ऋतूंची गंमत





१) आपल्या आजू बाजूला खाली दिलेली बदल केव्हा घडतात?

- घाम येतो, सुट्ट्या लागतात, ऊन, कुल्फी
- चिखल, छत्री, मोर, काळेढग
- सर्दी, चादर, टोपी, लोकरीचे कपडे



२) तुम्हाला सर्वात जास्त कोणता ऋतू आवडतो? का?



३) तुम्हाला कोणती फळे/भाज्या आवडतात. त्यांची नावे लिहा, चित्रे काढा आणि रंगवा.

४) तुम्हाला आवडणारे फळे/भाज्या हे कोणत्या ऋतूत उपलब्ध होतात? कोणत्या महिन्यात?

५) काही फळे/भाज्या हिवाळ्यात किंवा उन्हाळ्यातच बघायला मिळतात. असे का? याबाबत आपल्या घरातील मोठ्या व्यक्तीं सोबत चर्चा करा, माहिती मिळवा आणि लिहा.



६) तांदूळ, गहू, ज्वारी हि पिके कधी घेतली जातात? यांची पेरणी, कापणी कधी होते? कोणत्या महिन्यात?

७) वरील चित्रात कोणता ऋतू असेल ? का ?

तुम्ही पण कोणत्याही एका ऋतूचे चित्र बनवा.

## १७ ओळखा स्वत:ला आणि कुटुंबाला

**हे झाड बघा. तुम्हाला तुमच्या स्वत:बद्दल काय काय आवडते? या झाडाच्या प्रत्येक पानांमध्ये अशी एक गोष्ट लिहा आणि तुमच्या झाडाला सजवा रंगवा.**



१) वरील झाड आहे असेच झाड तुम्हाला आपल्या घरातील माणसांसाठी बनवायला आवडेल का?

- असे सुंदर झाड एका कागदावर बनवा.
- झाडाच्या प्रत्येक पानावर आईबद्दल तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टी लिहा.
- झाडाला छान सजवा आणि त्यांना भेट करा.

आपल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्यांसाठी (जसे बाबा/भाऊ/बहिण/आजी/आजोबा) असे झाड नक्की बनवा आणि त्यांना भेट करा.  त्यांना आवडेल ना?

तुम्ही झाडाची पाने बदाम या आकारा ऐवजी वेगळा देखील काढू शकता.

## १८. कोरोना शब्द कोडे



हे शब्दकोडे कोरोना संबंधित गोष्टींवर आधारित आहे.

मुलांना;

– शब्द कोणत्या अंकवर सुरु होतो,

– कशाशी संबधित आहे (खाली सुगावा / सूचना दिल्या आहेत)

– शब्द आडवा किंवा उभा मांडलेला आहे,

अशा बाबी समजण्यास मदत करावी.  तसेच उत्तर इंग्रजीमधील शब्द असू शकतो पण लिहिताना ते मराठीत (लिपी) लिहावे.



१) कोरोना आजारामधील एक लक्षण (आडवे)
२) आपण आता बाहेर जाताना हे तोंडाला बांधतो. (उभे)
३) कोरोना मुळे सर्वत्र हे लागू झाले. (आडवे)
४) आपण हात स्वच्छ ठेवण्यासाठी या गोष्टीचा जास्त वापर करत आहोत. (उभे)
५) आता पेशंटला आजारापासून वाचवण्यासाठी हे प्रयत्न करत आहेत (उभे)
६) या आजाराच्या नावामध्ये एक संख्या येते. ती संख्या (उभे)
७) १४ दिवस कोरोना संशयितव बरे होऊन घरी गेल्यावर हे व्यक्तीला करतात (आडवे)
८) डॉक्टरांच्या जोडीला हे देखील त्यांना खूप मदत करतात.
९) मोदींनी आपल्याला हे वाजवायला सांगितले होते. (उभे)
१०) डॉक्टर, सफाई कर्मचारी, पोलीस यांना आपण ---------- म्हणतो. (उभे )
११) आपण शिंकताना हात ठेवायला पाहिजे. (आडवे)
१२) या लोकांचे खूप हाल झाले. (उभे)
१३) आपण जर नियम मोडले तर आपल्याला बसतो. (उभे)
१४) पेशंटला तपासण्यासाठी डॉक्टर हे घालतात. (उभे)
१५) आता एकमेकांच्या हातात हात मिळवण्याऐवजी आपण हे करायला हवे. (उभे)
१६) कोरोना होऊन बरे झालेल्या व्यक्तीची आपण यासाठी मदत घेऊ शकतो. (आडवे)
१७) गर्दीच्या ठिकाणी आपल्याला हे पाळायची गरज आहे. (आडवे)

**माझे नाव** ------------------------------------------------------------------------------------------------------------

**इयत्ता** ------------------------------------------------------------------------------------------------------------



| **क्र .** | **कृतीचे नाव** | **काय शिकलात?** | **काय आवडले?** | **काय अडचणी आल्या?** | **तुमचे मत** | **पूर्ण झाले** | **दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बोलूया चित्रा वरती | | | | | | |
| २. | चला चिंटू सोबत | | | | | | |
| ३. | मोठ्यांच्या मदतीने<br>शिकू काही | | | | | | |
| ४. | आम्हालाच सर्व<br>सांगतात. | | | | | | |
| ५. | एक उभी रेषा आणि<br>एक आडवी रेषा | | | | | | |
| ६. | ओळखा पाहू मी कोण | | | | | | |

| क्र . | कृतीचे नाव | काय शिकलात? | काय आवडले? | काय अडचणी आल्या? | तुमचे मत | पूर्ण झाले | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | जाहिरातबाजी | | | | | | |
| ८. | पत्त्यांच्या खेळाची गंमत | | | | | | |
| ९. | मुठीची मजा | | | | | | |
| १०. | चित्रावरून गोष्टीकडे | | | | | | |
| ११. | जादू दाखवा | | | | | | |
| १२. | शब्द्चक्र | | | | | | |
| १३. | शिकूया चित्रातून | | | | | | |
| १४. | दरवाजे आणि खिडक्या | | | | | | |

| क्र . | कृतीचे नाव | काय शिकलात? | काय आवडले? | काय अडचणी आल्या? | तुमचे मत | पूर्ण झाले | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५. | चित्र विचित्र चेहरे | | | | | | |
| १६. | ऋतूंची गंमत | | | | | | |
| १७. | ओळखा स्वतःला व कुटुंबाला | | | | | | |
| १८. | कोरोना शब्दकोडे | | | | | | |

IN COLLABORATION WITH

SF9, G Block, Adjacent to American School of Bombay,
Bandra - Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400098, Tel.: +91 22 2652 0601 / 02

www.savethechildrenindia.org